# फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १४५/२०१९ निशाणी ८ खालील आदेश.

(चैत्राली गोळे वि. सचिन गोळे व इतर)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला कडून मुळ अर्ज निकाली होई पावेतो अर्जदार हिस अंतरीम पोटगी रक्कम दरमहा रक्कम रुपये २०,०००/– व तिच्या मुलीस रक्कम रुपये १०,०००/– देण्याचा आदेश व्हावा करीता दाखल केला आहे.

## अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–

२. अर्जदाराच्या अर्जातील कथनाप्रमाणे सामनेवाला क्र. १ हा अर्जदार क्र. १ चा पती आहे. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना विवाहसंबंधातुन अंकिता नावाची मुलगी असुन अर्जदार हि तीचे मुलीसह नातेवाईकांकडे राहत आहे. अर्जात कथन केल्याप्रमाणे सामनेवाला यांनी अर्जदारास मारहाण करुन शारिरीक, मानसिक व कौटुंबीक त्रास देवुन घरातुन हकलावुन दिले आहे. त्यामुळे अर्जदार हि नाईलाजास्तव तीच्या मुलीसह तीचे नातेवाईकांकडे आश्रितासारखे राहत आहे. सामनेवालांनी हकलावुन दिल्या पासुन अर्जदार व तीच्या मुलीचे खाणे पिणे, औषधोपचार, कपडेलत्ते व मुलीच्या शिक्षणाची कोणतीही सोय सामनेवाला क्र. १ ने केलेली नाही. करीता, अर्जदाराने प्रस्तुतचा अंतरीम पोटगीचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराच्या मते तीला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वतःचा चरितार्थ चालविण्यास समर्थ नाही. उलटपक्षी सामनेवाला क्र. १ हा दुबई येथे Valley Valmont middle east FZE या मल्टीनॅशनल कंपनीमध्ये नोकरीस आहे. त्यापासुन त्याला दरमहा ९० हजार ते १ लाख पर्यंत पगार मिळतो. तसेच एकसर ता. वाई, जि. सातारा या ठिकाणी त्यांची बागायती शेती असून त्यापासुन खर्च बजा जाता त्यास दरमहा २ ते ३ लाख इतके वार्षीक उत्पन्न मिळते व त्याचा वाई येथे प्रशस्त फ्लॅट असुन त्यापासून त्यास भाडेपोटी रक्कम रुपये १० ते १५ हजार इतके प्रतिमहा भाडे मिळते. त्यामुळे सामनेवाला क्र. १ चे आर्थीक परिस्थीती वरुन

सामनेवाला क्र. १ हा अर्जदार व तीच्या मुलीच्या चरितार्था करीता दरमहा पोटगी देण्यास समर्थ आहे. करीता, अर्जदार हिने सामनेवाला कडून दरमहा तीच्यासाठी रक्कम रुपये २०,०००/– व तीच्या मुलीसाठी रक्कम रुपये १०,०००/– अंतरीम पोटगी देण्याचा आदेश होण्याची विनंती केली आहे

४. सामनेवाला क्र. १ ने निशाणी १३ वर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. सामनेवालाने अर्जदाराचा मुळ अर्ज व अंतरीम पोटगीच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. सामनेवालाच्या म्हणण्यातील कथना नुसार त्याने अर्जदाराच्या मुळ अर्जात केलेल्या आरोपा प्रमाणे कोणताही कौटुंबीक हिंसाचार केलेला नाही अथवा अर्जदारास घरातुन हकलवुन दिले नाही. अर्जदार हि तीच्या स्वेच्छेने स्वतंत्र माहेरी राहत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अंतरीम पोटगीचा अर्ज चालु शकत नाही. सामनेवालाने त्याच्या म्हणण्यात पुढे अर्जदार हि सामनेवालासह राहत असताना अर्जदाराने सामनेवालास दिलेल्या मानसिक त्रासा बाबत कथने केली आहेत.

५. सामनेवाला क्र. १ चे मते तो दुबई येथे Aalmonti middle East Fze या कंपनीत वेल्डर म्हणून नोकरीस असुन त्यास दरमहा १५०० दिराम एवढा पगार आहे. सदर पगाराचे भारतीय पैशांमध्ये २९,५००/– एवढा पगार सामनेवाला यास मिळतो. सामनेवाला याला दरमहा स्वतःच्या खाण्यापिण्यासाठी व तेथील भाडयाने घेतलेल्या रुम रेंटसाठी दरमहा २०,०००/– खर्च येतो. तसेच सामनेवाला यांची आई ही वयोवृध्द आहे ती पूर्णपणे सामनेवाला यांच्या उत्पन्नावर अवलंबुन आहे. सामनेवाला यालाच तीचे पालनपोषन करावे लागते. सामनेवाला यांच्याकडे दरमहा तीन हजार रुपये शिल्लक राहतात. त्यामुळे सामनेवाला हा अर्जदार हिला कोणतीही पोटगी देण्यास सक्षम नाही. त्यामुळे त्याचा खर्च भागत नाही. अर्जदार हिला एच. एम. पी. नं. १४३/२०१७ या प्रकरणामध्ये पोटगी मंजुर झालेली आहे. त्यामुळे पुन्हा अर्जदाराला पोटगी मागता येणार नाही. करीता, सामनेवाला क्र. १ ने अर्जदाराचा अंतरीम पोटगीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

६. अर्जामधील कथने, सामनेवालाचे अर्जास म्हणणे तसेच अभिलेखावर दाखल प्रथमदर्शनी पुरावा व अर्जदार वकिलांचा युक्तिवाद यांचा विचार करता, सदर अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| | | | |
| १ | अर्जदार हे सामनेवाला कडून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास अंतरीम पोटगीची रक्कम किती ? | .. | होय. दहमहा र. रु. ७०००/– |
| | | | |
| २ | आदेश काय? | .. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

–: **कारणमिमांसा:–**

७. उभयपक्षकारांनी त्यांच्यातील लग्न संबंध कबुल केलेले आहेत. अर्जातील कथनावरुन अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे एकत्रित सहजीवन व्यतिथ केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. त्यामुळे अर्जासाठी आवश्यक असणारे घरगुती नातेसंबंध अर्जदार व सामनेवाला यांच्या दरम्यान अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते.

**मुद्दा क्र. १ व २ बाबतः–**

८. कौटुंबीक हिंसाचारा पासुन स्त्रीयांचे संरक्षण कायदा कलम २३ नुसार अंतरीम पोटगीचा अर्ज निकाली करते समयी अर्जदारास ती सामनेवाला यांचे पासुन कौटुंबीक हिंसाचाराने पिडीत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करणे गरजेची आहे. प्रस्तुतचा अर्ज निकाली करते समयी उभय पक्षकारांनी त्यांची केस पुर्णतः शाबीत केली आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे नाही. सदर कायद्यातील परिस्थीतीस अनुसरुन प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहीला असता अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांनी एकमेकां विरुध्द कौटुंबीक हिंसाचाराची कथने केली आहेत.

९. अर्जदार हिने तीच्या शपथपत्रात सामनेवाला यांनी केलेल्या कौटुंबीक

हिंसाचारामुळे ती तीच्या मुलीसह नातेवाईकांकडे राहत असल्याचे कथन केले आहे. तर सामनेवाला क्र. १ ने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार हि तीच्या इच्छेने कोणत्याही संयुक्तीक कारणा शिवाय विनाकारण माहेरी राहत असल्याचे कथन केले आहे. सदर अर्जदाराने तीच्या प्रस्तुतच्या अर्जामध्ये सामनेवाला यांनी केलेल्या त्रासाबद्दल स्पष्ट असे कथन केलेले आहे. तसेच अर्जदारांचे पालन पोषण करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याची आहे. परंतु, सामनेवालाने अर्जदार हि तीच्या मुलीसह तीच्या नातेवाईकांकडे राहत असल्या पासुन अर्जदार व तीच्या मुलीचे पालन पोषण करण्याकरीता कोणतीही व्यवस्था केलेली नाही. तसेच तशी व्यवस्था केल्याबाबत सामनेवाला क्र. १ याने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सदरची बाब हि देखील सामनेवाला क्र. १ याने अर्जदार यांचे उदर निर्वाहाची व्यवस्था न केल्याने कौटुंबीक हिंसेत गणली जाते. त्यामुळे प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी अर्जदार हिच्यावर कौंटुंबीक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१०. एकंदरीत, अर्जदार व सामनेवाला यांची परस्पर विरोधी कथनावरील विवेचनावरुन अर्जदार हिने सामनेवाला यांच्याकडून तीला झालेल्या कौटुंबीक हिंसाचारा बाबत स्पष्ट कथने केलेली आहेत. अर्जदार हि तीच्या मुलीसह वेगळी राहत आहे व वेगळी राहत असल्यापासुन सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराच्या व तीच्या मुलीच्या दैनंदीन निर्वाहा बाबत नियमीतपणे व्यवस्था केलेली नाही. सदरील बाबी ह्या प्रस्तुतचा अर्ज निकाली करते समयी सामनेवाला क्र. १ ने अर्जदाराचा कौटुंबीक हिंसाचार केला हे प्रथमदर्शनी शाबीत करण्याकरीता पुरेश्या आहेत. करीता, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटुंबीक हिंसाचार केला असुन अर्जदार हि कौटुंबीक हिंसाचाराने पिडीत आहे ही बाब प्रथमदर्शनी पुराव्यावरुन प्रस्तुतचा दरम्यानचा पोटगी अर्ज निकाली करते समयी शाबीत होते.

११. अर्जदाराने प्रथमदर्शनी सामनेवालाकडून होणारा कौटुंबीक हिंसाचार शाबीत केला आहे. अर्जदार हि तीच्या मुलीसह सामनेवाला पासुन तीच्या

नातेवाईकांकडे वेगळी राहत आहे. अर्जदार व तीच्या मुलीच्या उदरनिर्वाहाची व राहण्याची व्यवस्था करणे हि सामनेवाला क्र. १ याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे. परंतु सामनेवाला क्र. १ याने तशी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार सामनेवाला क्र. १ कडून तीचे व तीच्या मुलीच्या दैनंदीन उदरनिर्वाहासाठी, अर्जदार क्र. २ चे शिक्षणाच्या सोईसाठी दरम्यानची पोटीगी मिळण्यास पात्र आहे.

१२. दरम्यानच्या पोटगीची रक्कम ठरविते वेळी अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांनी एकमेकांच्या आर्थिक परिस्थीती बाबत अभिलेखावर केलेली कथने पाहीली असता, अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ हा दुबई येथे Valley Valmont middle east FZE या मल्टीनॅशनल कंपनीमध्ये नोकरीस आहे. त्यापासुन त्याला दरमहा ९० हजार ते १ लाख पर्यंत पगार मिळतो. तसेच एकसर ता. वाई, जि. सातारा या ठिकाणी त्यांची बागायती शेती असून त्यापासुन खर्च बजा जाता त्यास दरमहा २ ते ३ लाख इतके वार्षीक उत्पन्न मिळते व त्याचा वाई येथे प्रशस्त फ्लॅट असुन त्यापासून त्यास भाडेपोटी रक्कम रुपये १० ते १५ हजार इतके प्रतिमहा भाडे मिळते असे कथन केले आहे. सामनेवाला क्र. १ ने तो दुबई येथे Aalmonti middle East Fze या कंपनीत वेल्डर म्हणून नोकरीस असुन त्यास दरमहा १५०० दिराम एवढा पगार आहे. सदर पगाराचे भारतीय पैशांमध्ये २९,५००/– एवढा पगार सामनेवाला यास मिळतो हे मान्य केलेले आहे. अर्जदाराने सामनेवाला याला शेती व इतर गोष्टीतुन उत्पन्न मिळत असल्याचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच सामनेवालाने अर्जदार ही कमावती आहे असे दाखविणारा पुरावा दाखल केलेला नाही. सामनेवालाने त्याच्याकडे उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे मान्य केलेले आहे. सामनेवाला हा शारिरीकदृष्टया सक्षम आहे. त्यामुळे सामनेवाला याच्याकडे अर्जदारांना पोटगी देण्या इतपत निश्चीत उत्पन्न उपलब्ध आहे असे म्हणता येईल.

१३. प्रस्तुत प्रकरणात सामनेवालाने असे कथन केले आहे की, अर्जदार

हिला एच. एम. पी. नं. १४३/२०१७ या प्रकरणामध्ये अर्जदार क्र. १ हिस ६०००/– व अर्जदार क्र. २ करीता २५००/– इतकी पोटगी मंजुर झालेली आहे. त्यामुळे पुन्हा अर्जदाराला पोटगी मागता येणार नाही. परंतु येथे नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, सामनेवालाने एच. एम. पी. नं. १४३/२०१७ प्रमाणे पोटगी भरल्याचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदाराने असे कथन केले आहे की, सामनेवालाने सदरचे प्रकरण हे काढून घेतलेले आहे. त्यामुळे तीला मंजुर झाल्याप्रमाणे पोटगी मिळालेली नाही. निशाणी २२ सोबत दाखल कागदपत्रावरुन सामनेवालाने एच. एम. पी. नं. १४३/२०१७ हे प्रकरण काढून घेतल्याचे दिसुन येते. त्यामुळे सद्य स्थीतीत पोटगी संदर्भात कोणताही आदेश प्रलंबीत नसल्याचे दिसुन येते.

१४. एकंदरीत, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचे परिस्थीती बाबत वरील विवेचनावरुन आणि सध्याची सामाजिक परिस्थीती पाहता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व तीच्या मुलीच्या शैक्षणिक, दैनंदीन खर्चासाठी, उदरनिर्वाहासाठी करीता दरमहा रक्कम रुपये ७०००/– रुपये अंतरीम पोटगी देण्याचा आदेश करणे योग्य व रास्त वाटते. करीता, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ व २ यांना अंतरीम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ७०००/– मुळ अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा अंतीम निकाल होईपर्यंत द्यावेत.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2023.01.11 12:03:26 +0530

कोरेगाव.
दि. १०/०१/२०२३

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव.

**–: प्रमाणपत्र :–**

मी प्रमाणीत करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– लक्ष्मण पुरुषोत्तम दिक्षित

न्यायालयाचे नांव :– न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, कोरेगांव.

पिडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक :– ११/०१/२०२३

स्वाक्षरीत /–
लघुलेखक, श्रेणी– ३